**श्री.रामदास चव्हाण** अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :-समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे-५

दूरध्वनी क्रमांक :-२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :- स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई-मेल :- sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :- सविवि/ 2499
दिनांक :- 20/11/2025.

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.

अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. 8/2025

अपिलार्थी नांव व पत्ता :-
**श्री. राजेश गायकवाड**
रा. प्राची अपार्टमेंट, घोरपडी गाव, अनंत थेअटरमागे
पुणे

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
**श्री. असंग पाटील,**
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

**श्री. राजेश गायकवाड व इतर तीन --- अपिलार्थी**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक ६/१०/२०२५रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ८/९/२०२५ | ७/१०/२०२५ | ७/१०/२०२५ | - | - |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक ८/९/२०२५ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहितीनुसार समाधान न झाल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| ६/११/२०२५ | ६/१०/२०२५ | - होय | लागू नाही | ९/१०/२०२५ |

**<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u>** दिनांक ०७/११/२०२५, सकाळी ११.३० वाजता.

**<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक ०७/११/२०२५रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

**<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक ०७/११/२०२५रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-**

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | दिनांक ११.६.२०२५ रोजी समाज विकास विभाग पुणे महानगरपालिका जा.क्र.सविवि/३६२ या पत्रात आवश्यकता नसताना आमच्या संस्थेची नावे समाविष्ट करून कौशल्य विकास रोजगार * सदर संस्थांची आपल्याकडे नोंदणी व उद्योजकता विभागाला कळविण्यात आले की करून घ्यावी " माननीय साहेबांना आम्ही विनंतीपूर्वक नमूद करतो की, आमच्या संस्थेची नोंदणी कौशल्य विकास रोजगार व उद्य्ोजकता विभागात पूर्वीच झालेली होती व त्यांच्या शिफारशींचा विचार करूनच आमच्याबाबत कामे देण्याबाबतचे निर्णय झालेले होते. तसेच आमच्या कामाच्या बाबतीत पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीत ठराव होऊन कार्यालयीन परिपत्रक काढलेले असताना इतर संस्थांच्या म्हणजेच ज्या संस्थांची आयुक्तांची मान्यता नव्हती अथवा आयुक्त मान्यता होऊन कार्यालयीन परिपत्रक न झालेल्या संस्थांच्या यादीमध्ये आमच्या वरील नमूद संस्थांची नावे टाकून जाणीवपूर्वक आमच्या संस्थांचे कामे कशी थांबतील असे प्रयत्न आपल्या विभागाकडून जाणीवपूर्वक करण्यात आले. अशी आपल्याकडून झालेली कृती करण्याचे जे प्रयोजन होते/आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी | सदर माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही |

"विवेचन"

सदर बाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती वेळेत उपलब्ध करून न दिल्याने अपिलार्थी यांनी अपिल क्र. PUMCO/A/2025/60356, दि. ४/१०/२०२५ रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागविली असताना ३० दिवसाची मुदत संपल्यावर देखील माहिती उपलब्ध करून दिली नाही. म्हणून ऑन लाईन पोर्टल वर दि. ४/१०/२०२५ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

आमच्या कामाच्या बाबत पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीत ठराव होवून कार्यालयीन परीपत्रक काढलेले असताना इतर संस्थांच्या म्हणजेच ज्या संस्थांना आयुक्तांची मान्यता नव्हती अथवा मान्यता होवून कार्यालयीन परिपत्रक न झालेल्या संस्थांच्या यादी मध्ये आमच्या संस्थांची नावे टाकून जाणवी पुर्वक आमच्या संस्थेंची कामे कशी थांबतील असे प्रयत्न आपल्या विभागाकडून जाणीव पुर्वक करणेत आले. असे लेखी म्हणणे अपिलार्थी यांनी प्रथम अपिल सुनावणीच्या वेळी दि. ७/११/२०२५ रोजी दिले आहे.

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने मा. स्थायी समितीने ठराव केलेल्या सर्व संस्थांची यादी पुणे मनपाने कौशल्य रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडे सादर केली आहे. तथापि मा. स्थायी समिती यांच्या ठराव क्र. ७८४, दि. ३१/७/२०१८ अन्वये प्रबुद्ध स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित व जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या संस्थांना व मा. स्थायी समिती यांच्या ठराव क्र. २८७४, दि. ८/३/२०१९ अन्वये हेल्पलाईन स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या, विश्वास आधार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. असे चार संस्थांना मान्यता दिली आहे. सद्या चारही संस्था काम करीत आहेत. सदर माहितीने अर्जदाराचे समाधान झाले असल्याने अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

४) श्री. राजेश गायकवाड्रा. प्राची अपार्टमेंट, घोरपडी गाव, अनंत थेअटरमागे, पुणे

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी